**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2022 - 2023**


# रयतेचा कैवारी

डिजिटल शैक्षणिक दैनिक






संपादक - शाहू संभाजी भारती ( डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' - वर्ष तिसरे - अंक २४६) बुधवार दि.१३/०७/२०२२ पान ०६


## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात पी. एच. डी. विद्यार्थ्यांचे अहवाल सादरीकरण

सोलापूर : दि. १२ (रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व पीएच. डी. संशोधन केंद्र यांच्या वतीने शनिवार दिनांक ९ जुलै २०२२ रोजी संशोधन सल्लागार समितीसमोर पीएच. डी. संशोधन विद्यार्थ्यांच्या सहामाही प्रगती अहवालाचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस.गोरे,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय अभ्यासचे अधिष्ठाता प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे, विद्यापीठ नियुक्त विषयतज्ञ म्हणून प्रा. डॉ. व्ही. बी. किडगावकर व प्रा. डॉ. डी. एस. वाघमारे, समन्वयक डॉ. एम. व्ही. मते उपस्थित होते.

विद्यापीठाच्या प्रपत्रानुसार पेट ७ व पेट ८ मधील पीएच. डी. संशोधन विद्यार्थ्यांनी सहामाही प्रगती अहवालाचे सादरीकरण संशोधन सल्लागार समितीसमोर सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. संशोधन सल्लागार समितीच्या कार्यवाहीनुसारच सदर सहामाही प्रगती अहवाल विद्यापीठात सादर केले जाणार आहेत.




याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयात संशोधन सल्लागार समितीसमोर पीएच. डी. संशोधन विद्यार्थ्यांनी अहवाल सादर केले. यात एकूण ४५ पीएच. डी. संशोधन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यावेळी प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे व प्रा.डॉ.डी. एस. वाघमारे यांनी पीएच.डी. संशोधन विद्यार्थ्यांना सखोल व प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी पीएच. डी. संशोधन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विहित कालावधीत गुणवत्तापूर्ण संशोधन कार्यवाही व्हावी या उदात्त हेतूने विद्यापीठाने प्रत्येक संशोधन केंद्रात संशोधन सल्लागार समिती स्थापन केल्याचे सांगितले. या समितीच्या माध्यमातून सहामाही प्रगती अहवालाचे मूल्यांकन करण्यात येणार आहे. संबंधित विषयतज्ञ आवश्यक त्या सूचना व मार्गदर्शन करणार आहेत. यामुळे पीएच. डी. संशोधन विद्यार्थ्यांना योग्य दिशेने गतिमान कार्यवाही करता येईल असे त्यांनी सांगितले.

पीएच. डी. संशोधन विद्यार्थ्यांनी पॉवर पॉईंट द्वारे अहवालाचे सादरीकरण केले. यात संशोधन उद्दिष्टे, संशोधन व्याप्ती,संशोधन कालावधी, सत्रनिहाय उद्दिष्टे, सत्रात प्राप्त केलेली उद्दिष्टे, सत्रात पूर्ण केलेल्या कार्यवाहीचा तपशील, निष्पत्ती व निष्कर्ष, महत्वपूर्ण योगदान बाबी, संशोधन आढावा, पुढील सत्राची योजना व उद्दिष्टे आदी घटकांवर सखोल चर्चा केली.

संशोधन सल्लागार समितीने संशोधन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व सूचना केल्या. तसेच संबंधित कार्य व अहवाल संशोधन विद्यार्थ्यांकडून पूर्ण करून घेण्यात आले. या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. एम. व्ही. मते यांनी कार्य केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे, समन्वयक डॉ. एम. व्ही. मते व संशोधन मार्गदर्शक शिक्षक व विद्यार्थी आदींनी परिश्रम घेतले.


College of Education Dist. Solapur Barshi.

पुढारी

News by
गणेश गोडसे,बार्शी

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात 'बोल अनुभवांचे' कार्यक्रम

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात 'बोल अनुभवांचे' तथा शालेय आंतरवासिता अहवाल प्रकाशन व सादरीकरण कार्यक्रम उत्साहात झाला. यावेळी महाराष्ट्र विद्यालयाचे मुख्याध्यापक जी. ए. चव्हाण प्रमुख पाहुणे, तर अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. एस.डी. भिलेगावकर होते.



**बार्शी : शिक्षणशास्त्र महाविद्यालयात 'बोल अनुभवांचे' या उपक्रमांतर्गत कार्यक्रमाप्रसंगी मान्यवर.**

यावेळी कार्यक्रम समन्वयक डॉ. एम.व्ही. मते व डॉ. पी.ए. पाटील, डॉ. आर.ए. फुरडे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे यांचे १२ सप्टेंबर ते ३० सप्टेंबरदरम्यान बी. एड्. द्वितीय वर्ष सत्र तिसरे अंतर्गत सराव अध्यापन व छात्रसेवाकाल शिबिर तथा शालेय आंतरवासिता उपक्रमाचे आयोजन बार्शीतील महाराष्ट्र विद्यालय, जिजामाता विद्यामंदिर, साधना कन्या प्रशाला, मॉडेल हायस्कूल व शाह कन्या प्रशाला येथे करण्यात आले. विद्यापीठाच्या निर्देशानुसार प्रात्यक्षिक अंतर्गत सराव पाठाचे आयोजन व उपक्रम कार्यवाही करण्यात आली. या छात्रसेवाकाल शिबिरामध्ये बी. एड्. प्रशिक्षणार्थींनी सराव पाठ टाचण, आशययुक्त अध्यापन, सलग पाठ, पाठ निरीक्षण, ई-शैक्षणिक साहित्यनिर्मिती व वापर, भाषिक कौशल्ये विकास, प्रकल्प अध्ययन, समाजसेवा, मानसशास्त्रीय कसोटी, अभ्यासावरील उपक्रम, व्यक्ती अभ्यास, अवांतर माहिती आदी प्रकारची प्रात्यक्षिके पूर्ण केली. प्रास्ताविक डॉ. एम. व्ही. मते यांनी केले. आभार डॉ. पी. ए. पाटील, तर ऐश्वर्या कापसे यांनी सूत्रसंचालन केले.

My Solapur Edition
Oct 23, 2022 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

College of Education
Dist. Solapur
Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2022 - 2023**

पुढारी

News by
गणेश गोडसे, बार्शी



बार्शी : स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंसमवेत शिक्षकवृंद.

## आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी सोलापूरचा संघ रवाना

**बार्शी :** अमरावती येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ व्हॉलीबॉल (मुली) स्पर्धेसाठी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठाचा मुलींचा संघ रवाना झाला आहे. ही स्पर्धा ३० ऑक्टोबरपासून ते ३ नोव्हेंबरपर्यंत असणार आहे. विद्यापीठ संघाला विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस, प्र. कुलगुरू डॉ. गादेवार, कुलसचिव योगिनी घारे, विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. गुणवंत सरवदे, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी.वाय. यादव, नंदन जगदाळे, पी.टी. पाटील, अरुण देबडवार, जयकुमार शितोळे, प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे यांनी शुभेच्छा दिल्या. संघ पुढील प्रमाणे : मोनिका पाटील (कर्णधार), गायत्री मोहिते, मयुरी जगताप, सोनाली गोडगे, सोनाली रामगुडे, आचल वर्पे, मंजुषा उन्हाळे, सलोनी बनकर, मयुरी कोष्टी, वैष्णवी ताटे, निकिता मिसाळ, नौशीन चांदा या खेळाडूंचा समावेश आहे.

My Solapur Edition
Oct 31, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

College of Education
Dist. Solapur
Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2022 - 2023**

पुढारी

News by
गणेश गोडसे,बार्शी

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात माजी विद्यार्थी स्नेहमेळावा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

शिक्षणशास्त्र महाविद्यालयात १९९७-९८ बी.एड. बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील जुन्या आठवणींना उजाळा दिला.

प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. सी. एस. मोरे, तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ एस. एस. गोरे होते. याप्रसंगी बी. एड.ला अध्यापन करणारे प्राध्यापक डॉ. एम. ए. गायकवाड, डॉ. मोहिते, तोडकरी, डॉ. एस. डी. भिलेगावकर, डॉ. ए. जी. कांबळे तसेच प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि माजी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली. प्रास्ताविक तन्वीर बेग यांनी केले. याप्रसंगी प्राचार्य व उपस्थित सर्व गुरुजनांचा सत्कार करून सर्व माजी विद्यार्थ्यांनी गुरुंबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. याप्रसंगी डॉ. ए. जी. कांबळे यांनी महाविद्यालयाचा विकास, भौतिक सुविधा व पुढील वाटचाल यासंबंधी मनोगत व्यक्त केले. सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपला परिचय दिला. आपला बी. एड. नंतरचा १९९७-९८ पासूनचा जीवनप्रवास व जुन्या आठवणींना उजाळा दिला. डॉ. सी. एस. मोरे यांनी आरोग्यासाठी व्यायाम करा, आपले क्षेत्र कोणतेही असो, प्रामाणिकपणे व निष्ठेने काम करा, अशा मुद्यांवर आपले सखोल मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी अध्यक्षीय भाषणात मार्गदर्शन करताना आपण सर्व माजी विद्यार्थी शैक्षणिक क्षेत्रात भरीव योगदान देत आहात याबद्दल सर्वांचे कौतुक केले पाहिजे, भविष्यात महाविद्यालयाशी आपले नाते असेच घनिष्ठ व्हावे, सर्वांनी एकमेकांचा आधार व्हावे व आपण महाविद्यालयासाठी योगदान द्यावे, अशी इच्छा व्यक्त केली. सूत्रसंचालन पडवळ यांनी केले. आभार डॉ. एस. डी. भिलेगावकर यांनी मानले.

My Solapur Edition
Nov 12, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

College of Education
Dist. Solapur
Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2022 - 2023**

पुढारी

News by
गणेश गोडसे, बार्शी



## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मैदानी क्रीडा स्पर्धा

**बार्शी :** बार्शीतील शिक्षणशास्त्र महाविद्यालय व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आंतर महाविद्यालय मैदानी क्रीडा स्पर्धा येथील शिवशक्ती मैदानावर पार पडल्या. ही स्पर्धा दहा हजार मीटर धावणे या क्रीडा प्रकारात झाली. याचे उद्घाटन संस्थेचे सचिव टी. पाटील यांनी केले. जयकुमार शितोळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, प्राचार्य डॉ. भारती रेवडकर, प्राचार्य डॉ. शशिकांत गाढवे, स्पर्धा सचिव प्रा. डॉ. एस. एम. लांडगे, डॉ. ए. जी. कांबळे, विद्यापीठ निवड समिती चेअरमन डॉ. किरण चोकाककर, डॉ. अशोक पाटील, डॉ. समर्थ मनुकर, प्रा. सचिन गायकवाड, डॉ. व्ही. पी. शिखरे उपस्थित होते. यावेळी संस्थेचे जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील, प्राचार्य डॉ. गोरे यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. वैयक्तिक विजेतेपद दयानंद कॉलेज सोलापूर येथील रितेश इतापे तर संगमेश्वर कॉलेज सोलापूर येथील संतोषी देशमुख यांना प्राप्त झाले.

Solapur Edition

College of Education, Dist. Solapur, Barshi.

रयतेचा कैवारी
डिजिटल शैक्षणिक दैनिक
संपादक : शाहू संभाजी भारती ( दैनिक रयतेचा कैवारी, वर्ष चौथे, अंक ०३६, एकूण अंक १०११) रविवार दि.१३/११/२०२२ पान ०४

# बार्शी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आंतरमहाविद्यालयीन मैदानी व व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धांचे आयोजन

सोलापूर : दि. १२ ( रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा ) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरमहाविद्यालयीन मुलांच्या व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेचे आयोजन ९ व १० नोव्हेंबर व मैदानी स्पर्धा ७ नोव्हेंबर २०२२ रोजी आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे जनरल सेक्रेटरी पी टी. पाटील तर उद्घाटक म्हणून संस्थेचे सहसचिव ए. पी. देबडवार हे होते. यावेळी माजी नगरसेवक तथा यशोदा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अरुणदादा बारबोले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस. एस. गोरे, स्पर्धा सचिव प्रा. डॉ. एस. एम. लांडगे, डॉ.ए. जी. कांबळे, आयक्यूएसी समन्वयक डॉ.व्ही. पी. शिखरे उपस्थित होते. यावेळी संस्थेचे जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील व सहसचिव ए. पी. देबडवार यांनी उपस्थित खेळाडूंना मार्गदर्शन केले. शुभेच्छा दिल्या.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. या स्पर्धेत एकूण २४ संघांनी सहभाग नोंदवला.

समारोप कार्यक्रमात संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे यांनी सहभागी खेळाडूंना मार्गदर्शन केले. विजेत्या संघास कै. नलिनी देशमुख यांच्या स्मरणार्थ ट्रॉफी देण्यात आली. या क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांक संगमेश्वर कॉलेज सोलापूर यांनी पटकावला. आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज माढा संघ उपविजेता ठरला. तृतीय व चतुर्थ क्रमांक अनुक्रमे के. बी. पी. महाविद्यालय, पंढरपूर व श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी यांनी संपादन केला. स्पर्धा यशस्वीतेसाठी महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, स्पर्धा सचिव प्रा. डॉ. एस. एम. लांडगे, प्रा. मकरंद भुजबळ, प्रा. राम नागटिळक, डॉ. मुस्ताक शेख, प्रा. नंदकुमार देशपांडे, प्रशांत बिराजदार, पंच म्हणून विविध शारीरिक शिक्षण संचालक तसेच क्रीडा मार्गदर्शक, बी. पी. एड. व एम. पी. एड. प्रशिक्षणार्थी यांनी योगदान दिले. प्रास्ताविक डॉ.ए. जी. कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. एस. एस. सुरवसे यांनी केले. आभार डॉ. एस. एस. लांडगे यांनी मानले.



College of Education
Dist. Solapur
Barshi.

पुढारी

News by
गणेश गोडसे,बार्शी

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

बार्शीतील शिक्षणशास्त्र महाविद्यालय व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धा पार पडल्या. प्रमुख पाहुणे पी. टी. पाटील, तर उद्‌घाटक म्हणून ए. पी. देबडवार उपस्थित होते.

यावेळी अरुण बारबोले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस. एस. गोरे, एस. एम. लांडगे, ए. जी. कांबळे, व्ही. पी. शिखरे उपस्थित होते. स्पर्धेत एकूण २४ संघ सहभागी होते. जयकुमार शितोळे यांनी सहभागी खेळाडूंना मार्गदर्शन केले. विजेत्या संघास नलिनी देशमुख यांच्या स्मरणार्थ ट्रॉफी देण्यात आली. प्रथम क्रमांक संगमेश्वर कॉलेज, सोलापूर, तर आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, माढा द्वितीय संघ ठरला. तृतीय व चतुर्थ क्रमांक अनुक्रमे के. बी. पी. महाविद्यालय, पंढरपूर व श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी यांनी संपादन केला. स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे, प्रा. मकरंद भुजबळ, प्रा. राम नागटिळक, डॉ. मुस्ताक शेख, प्रा. नंदकुमार देशपांडे, प्रशांत बिराजदार, पंच म्हणून विविध शारीरिक शिक्षण संचालक तसेच क्रीडा मार्गदर्शक, बी.पीएड. व एम.पीएड. प्रशिक्षणार्थी यांनी योगदान दिले. सूत्रसंचालन प्रा. एस.एस. सुरवसे यांनी केले.



**बार्शी : शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धेतील एक क्षण.**

My Solapur Edition
Nov 16, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2022 - 2023**


# रयतेचा कैवारी




संपादक : शाहू संभाजी भारती ( दैनिक रयतेचा कैवारी, वर्ष चौथे, अंक ०४०, एकूण अंक १०१५)  गुरुवार दि.१७/११/२०२२ पान ०९


## बार्शी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सीटीईटी मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन

सोलापूर: दि.१६(रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा)श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, स्पर्धा परीक्षा विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय सीटीईटी मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेसाठी साधन व्यक्ती म्हणून सोलापूर येथील डॉ. तय्यब शेख हे होते. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे हे होते. कार्यशाळेची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमा पूजनाने झाली.

यावेळी सीटीईटी व टीईटी उत्तीर्ण महाविद्यालयातील आजी व माजी विद्यार्थी यांचा मान्यवरांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. यात सरिता पोळ, सबा चौधरी, शेवंता राठोड, मधुरा गुंड, सोमनाथ वेदपाठक, अशोक वाघमारे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यशाळेचे प्रमुख साधन व्यक्ती डॉ.तय्यब शेख यांनी सीटीईटी परीक्षेची संपूर्ण तपशीलवारपणे माहिती दिली. यात परीक्षेचे स्वरूप, अभ्यासक्रम, गुणदान योजना, आशय यावर भर दिला. तसेच परीक्षेचा अभ्यास व संपूर्ण तयारी कशी करावी याविषयी सखोल मार्गदर्शन केले. उपस्थित विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले.

सहभागी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी प्रोत्साहन मिळाले. अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी महाविद्यालयाच्या माध्यमातून अशा प्रकारच्या उपक्रमांचे आयोजन सातत्याने केले जाते असे सांगितले. सध्याचे स्पर्धेचे युग आहे. यामुळे स्पर्धा परीक्षेला विशेष महत्त्व आहे. म्हणूनच विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाच्या जोरावर स्पर्धा परीक्षांना सामोरे जावे व यश प्राप्त करावे असे आवाहन त्यांनी केले.

कार्यशाळेचे प्रास्ताविक डॉ. एम व्ही मते यांनी केले. साधन व्यक्तीचा परिचय डॉ.एस. डी. भिलेगावकर यांनी करून दिला. उपस्थितांचे आभार सुशील व्हळे यांनी मानले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन श्रीकृष्ण गव्हाणे व सुशील व्हळे यांनी केले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. व्ही. पी. शिखरे, कार्यशाळा समन्वयक डॉ. एस. डी. भिलेगावकर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व प्रशिक्षणार्थी यांनी परिश्रम घेतले.



College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2022 - 2023**


# रयतेचा कैवारी

संपादक : शाहू संभाजी भारती ( दैनिक रयतेचा कैवारी, वर्ष चौथे, अंक ०४१, एकूण अंक १०१६) शुक्रवार दि.१८/११/२०२२ पान ०७


## बार्शीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयात ऑनलाईन आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

सोलापूर: दि.१७(रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा)श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दिनांक २२ नोव्हेंबर २०२२ रोजी एक दिवसीय ऑनलाईन आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेचा मुख्य विषय "न्यू ट्रेंड्स इन हायर एज्युकेशन " हा आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या पार्श्वभूमीवर शिक्षणक्षेत्रात आमूलाग्र बदल होत आहेत. शिक्षणाच्या सर्वच स्तरावर नाविन्यपूर्ण शिक्षण प्रणालीचा स्वीकार केला जाणार आहे. अध्ययन, अध्यापन, संशोधन, मूल्यमापन, प्रशिक्षण आदि क्षेत्रांची परिमाणे व्यापक होत आहेत. आगामी काळात एकात्मिक शिक्षक-शिक्षण अभ्यासक्रम राबविण्यात येणार आहे. म्हणूनच महाविद्यालयाने एक दिवसीय ऑनलाईन आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. उच्च शिक्षणातील नवीन प्रवाह याविषयी माहिती जाणून घेणे गरजेचे असल्याचे लक्षात घेऊन ही आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषद आयोजित केली आहे. या परिषदेचे उद्घाटन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरु मा. डॉ. मृणालिनी फडणवीस या करणार आहेत.



याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. तसेच संस्थेचे उपाध्यक्ष एन. एन. जगदाळे, जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील, सहसचिव ए. पी. देबडवार , खजिनदार जे. सी. शितोळे , संस्थेचे कार्यकारिणी सदस्य, विश्वस्त व सदस्य हे देखील परिषदेसाठी ऑनलाईन सहभागी होणार आहेत.

परिषदेसाठी मुख्य साधन व्यक्ती तथा मार्गदर्शक म्हणून सौदी अरेबिया येथील प्रोफेसर डॉ. कौकब अझीम, केरळ येथील डॉ. महेंद्र सावंत व कर्नाटक विद्यापीठ येथील डॉ.अरविंद व्ही. करबसनगौद्र हे मार्गदर्शन करणार आहेत.

या परिषदेत शिक्षक शिक्षण, क्रीडा आणि शारीरिक शिक्षण, उच्च शिक्षणातील संशोधने, उच्च शिक्षणातील अभ्यासक्रम सुधारणा, उच्च शिक्षणातील अध्ययन, अध्यापन व मूल्यमापन या उपविषयावर संशोधन पेपर सादरीकरण केले जाणार आहे. प्रत्येक उपविषयावर आधारित एक उत्कृष्ठ संशोधन पेपर अवॉर्ड दिला जाणार आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी महाराष्ट्रासह देशातील इतर राज्यातील आणि परदेशातील शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आदी सहभागी होणार आहेत. परिषदेतील संशोधन पेपरचे नामांकित संशोधन मासिकात प्रकाशन करण्यात येणार आहे.

या आंतरराष्ट्रीय स्तरावरील ऑनलाईन परिषदेमध्ये जास्तीत जास्त इच्छुकांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे (९८५०३६८३८५), आयक्युएसी समन्वयक डॉ. व्ही. पी. शिखरे (९५२७१७०४६१), परिषदेचे समन्वयक प्रा. डॉ. ए. जी. कांबळे(७५५८४७७४४४ ) व सहसमन्वयक डॉ.एम. व्ही. मते (९८८१३७६७००) व आयोजन समिती यांनी केले आहे.

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2022 - 2023**

पुढारी

News by
गणेश गोडसे,बार्शी

## संक्षिप्त



बार्शी : शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. तय्यब शेख.

### शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सीटीईटी मार्गदर्शन कार्यशाळा

**बार्शी :** बार्शी येथे एकदिवसीय सीटीईटी मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेसाठी साधन व्यक्ती म्हणून सोलापूर येथील डॉ. तय्यब शेख हे होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे हे होते. कार्यशाळेची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमा पूजनाने झाली. यावेळी सीटीईटी व टीईटी उत्तीर्ण महाविद्यालयातील आजी व माजी विद्यार्थी यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यात सरिता पोळ, सबा चौधरी, शेवंता राठोड, मधुरा गुंड, सोमनाथ वेदपाठक, अशोक वाघमारे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यशाळेचे प्रमुख डॉ. तय्यब शेख यांनी सीटीईटी परीक्षेची संपूर्ण तपशीलवारपणे माहिती देताना परी-क्षेचे स्वरूप, अभ्यासक्रम, गुणदान योजना, आशय यावर भर दिला. तसेच परीक्षेचा अभ्यास व संपूर्ण तयारी कशी करावी याविषयी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. एस एस गोरे यांनी महाविद्यालयाच्या माध्यमातून अशा प्रकारच्या उपक्रमांचे आयोजन सातत्याने केले जाते असे सांगत सध्याचे स्पर्धेचे युग आहे. यामुळे स्पर्धा परीक्षेला विशेष महत्त्व आहे. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाच्या जोरावर स्पर्धा परीक्षांना सामोरे जावे व यश प्राप्त करावे, असे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविक डॉ. एम व्ही मते यांनी केले. सूत्रसंचालन श्रीकृष्ण गव्हाणे यांनी केले. आभार सुशील व्हळे यांनी मानले.

Solapur Edition
Nov 22, 2022 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

College of Education, Dist. Solapur, Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2022 - 2023**

# रयतेचा कैवारी

संपादक : शाहू संभाजी भारती ( दैनिक रयतेचा कैवारी, वर्ष चौथे, अंक ०५७, एकूण अंक १०३२) रविवार दि.०४/१२/२०२२ पान ०२

## क्रीडा महोत्सव व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी बार्शीची गायत्री मोहिते संघनायक

सोलापूर: दि. ३(रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धा दिनांक ३ डिसेंबर ते ७ डिसेंबर २०२२ या कालावधीत औरंगाबाद येथे होत आहेत. या स्पर्धेमध्ये पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व्हॉलीबॉल मुलींचा संघ सहभागी होत आहे. सदर संघाचे सराव शिबिर बार्शीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालय येथे दिनांक २२ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२२ या कालावधीमध्ये पार पडले.

विद्यापीठाच्या संघामध्ये बार्शीचे सात खेळाडू आहेत. गायत्री मोहिते, मोनिका पाटील, मयुरी जगताप (शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी) वैष्णवी बानगुडे, आचल वर्पे, सोनाली गोडगे, सोनाली रामगुडे (श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी) मंजुषा उन्हाळे, सलोनी बनकर, मयुरी कोष्टी (संगमेश्वर कॉलेज, सोलापूर) वैष्णवी ताटे (एच एम कॉलेज, सोलापूर ) सायली भवर ( बाबुराव पाटील कॉलेज, अनगर ) यांचा समावेश आहे. या संघास प्रा. डॉ. सुरेश लांडगे यांनी मार्गदर्शन केले. संघ व्यवस्थापक डॉ. बापू मोहिते आहेत. या संघास महाविद्यालायचे प्राचार्य डॉ एस एस गोरे, डॉ. सुरेश लांडगे, प्राध्यापक वृंद, कर्मचारी व प्रशिक्षणार्थींनी शुभेच्छा दिल्या.



College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

## Publicity 2022 - 2023


# रयतेचा कैवारी

संपादक : शाहू संभाजी भारती ( दैनिक रयतेचा कैवारी, वर्ष चौथे, अंक ०५९, एकूण अंक १०३४) मंगळवार दि.०६/१२/२०२२ पान ०१


## २०२० च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने शिक्षण क्षेत्रात आमुलाग्र बदल होतील - पी. टी. पाटील

सोलापूर : दि.०५ ( रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा ) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी अंतर्गत शनिवार दिनांक १९ नोव्हेंबर २०२२ रोजी "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि शिक्षकांची भूमिका" या विषयावर राज्यस्तरीय परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या परिषदेचे उद्घाटन संस्थेचे जनरल सेक्रेटरी मा. पी. टी. पाटील यांच्या उपस्थितीत झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे होते. यावेळी माजी प्राचार्य डॉ. सी. एस. मोरे, तज्ञ साधन व्यक्ति म्हणून डॉ. एच. एन. जगताप, डॉ. दत्तात्रय तापकीर, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, रोटरी क्लब ऑफ बार्शीचे अध्यक्ष विजयश्री पाटील, समन्वयक डॉ. एस. डी. भिलेगावकर, आयक्यूएसी समन्वयक डॉ. व्ही. पी. शिखरे आदी उपस्थित होते.

उद्घाटन प्रसंगी पी. टी. पाटील म्हणाले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे यापूर्वीच्या आयोग व धोरणाचा आढावा घेऊन तयार करण्यात आले आहे. शिक्षणाच्या सर्व स्तरावर आमुलाग्र बदल केले जाणार आहेत. बदलत्या परिस्थितीत शिक्षकांनी आपली बदलती भूमिका लक्षात घेऊन नव्या आव्हानांना सामोरे गेले पाहिजे. उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना सर्जनशील बनविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनवणे हा मुख्य उद्देश आहे. यात व्यावसायिक कौशल्य विकास यावर भर दिला आहे. या संदर्भात आमच्या शैक्षणिक संस्थेने विविध परिसंवाद व परिषदांचे आयोजन केले आहे. संस्थेच्या सर्व शाखांमध्ये अद्ययावत तंत्रज्ञान सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. नवीन धोरणानुसार आमची शैक्षणिक संस्था शिक्षकांना सक्षम बनविण्यासाठी भक्कम पाठीशी राहील असे आश्वासन त्यांनी याप्रसंगी दिले.



डॉ.एच. एन जगताप यांनी "प्राथमिक शिक्षण स्तरावर शिक्षकांची भूमिका" या विषयावर मार्गदर्शन केले. आजन्म शिक्षणाला पुष्टी देणारे हे धोरण आहे. शिक्षक हे सर्वाधिक आदरास पात्र आहेत. मूल्य शिक्षणाची समाजाला व विद्यार्थ्यांना गरज आहे. शिक्षकांना आपला आशय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी विविध पद्धती, तंत्र व क्लृप्त्या यांचा आधुनिक पद्धतीने वापर करावा लागेल. समाज माध्यमाद्वारे ज्ञान पोहोचविणे गरजेचे होईल. विद्यार्थीकेंद्री अध्यापन पद्धती राबवावी लागेल.

शिस्तप्रिय आज्ञाधारक विद्यार्थी ही संकल्पना काळानुरूप बदलली आहे. उत्कृष्ट विद्यार्थी शिक्षण क्षेत्रात प्रवेश करतील अशी अपेक्षा ठेवून त्यासंबंधीचे प्रयत्न केले जातील. शिक्षक पात्रता चाचण्या सशक्त केल्या जातील. मुलाखती स्थानिक भाषेतून घेतल्या जातील. शाळांमध्ये चांगली व सुखकर स्थिती निर्माण केली जाईल. शाळाबाह्य कामे शिक्षकांना दिली जाणार नाहीत. शिक्षकांचे सातत्याने मूल्यमापन देखील केले जाईल असे त्यांनी सांगितले.

डॉ.चंद्रकांत बाविस्कर यांनी "उच्च शिक्षणातील शिक्षकांची भूमिका" याविषयी मार्गदर्शन केले. शैक्षणिक धोरणामुळे विकसनशील राष्ट्राकडून विकसित राष्ट्राकडे जायचे आहे. संमिश्र अध्ययनाचा वापर करावा लागेल. शिक्षक व विद्यार्थी बहुभाषिक व बहुआयामी होणे गरजेचे आहे. उच्च शिक्षणात संशोधन महत्त्वाचे असणार आहे. शिक्षकांना अध्यापन, अध्ययन, संशोधन, प्रशासन व विस्तार कार्य यात गुंतून घ्यावे लागेल. भविष्यातील तंत्रज्ञान अवगत करणे गरजेचे आहे. सद्यस्थितीतील तंत्रज्ञान कालबाह्य होऊन अद्ययावत तंत्रज्ञान स्वीकारणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना अभिरुचीनुसार ज्ञानप्राप्तीचे स्वातंत्र्य मिळणार आहे. शिक्षकांना नवीन अभ्यासक्रम विकसित करावे लागतील. भविष्यात वर्ग ही शिक्षणाची जागा असणार नाही तर विद्यार्थी कुठेही असला तरी शिकू शकेल. अधिक प्रभावी तंत्रज्ञान निर्माण होईल. शिक्षकांनी आपला अनुभव आणि चिंतनाद्वारे माहितीचा उपयोग ज्ञान मिळवण्यासाठी सातत्याने करणे गरजेचे आहे असे त्यांनी सांगितले

डॉ. दत्तात्रय तापकीर यांनी "माध्यमिक स्तरावर शिक्षकांची भूमिका" याविषयी मार्गदर्शन केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये सर्वांनी मिळून कसे शिकावे, शिक्षक नुसते विद्यार्थी घडवत नाहीत असे नाही त्याचे चारित्र्यही घडवतो. चारित्र्यवान समाज घडवतो. सकारात्मक बाजूने विचार करून ज्ञानरचनावादी अध्यापनसाठी माध्यमिक शिक्षकांना भूमिका करायची आहे. विशिष्ट विचार ठेवून शिक्षकांनी भूमिका करणे अपेक्षित आहे.

विद्यार्थ्यास कृती करायची आहे. शिक्षकांच्या भूमिका करताना अनेक अडचणी आहेत. यासाठी शिक्षक स्वाभिमानी, धाडसी, आत्मविश्वासू व विद्यार्थ्यांवर प्रेम करणारा असावा असे त्यांनी सुचवले.

अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शिक्षकाची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात शिक्षकाला मानाचे व सन्मानाचे स्थान देण्यात आले आहे. प्राचीन भारतीय गुरु -शिष्य परंपरा जोपासलेली दिसून येते. शिक्षकाची समाजातील प्रतिष्ठा खालावत चाललेली आहे. ही प्रतिष्ठा सुधारण्याचा प्रयत्न केलेला आहे. शिक्षकापुढे आव्हाने असतील, समस्या नाही. शिक्षक हा राष्ट्र निर्माता आहे हे धोरण सर्व शिक्षकापर्यंत पोहोचले पाहिजे. सर्वांना सहज शिक्षण, समान शिक्षण, सर्वांना परवडणारे शिक्षण, गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिक्षणाचे उत्तरदायित्व आदी घटकावर आधारित असे हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आहे. विद्यार्थ्यांचा मूलभूत विकास, अंतरवैयक्तिक संबंध, व्यक्तिमत्व विकास, शिस्त,मूल्ये, संस्कार आदी घटकावर आधारित बहुआयामी राष्ट्रीय धोरण आहे असे त्यांनी सांगितले.

या परिषदेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस. एस. गोरे, सर्व विभागाचे विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, रोटरीचे पदाधिकारी व सदस्य आदींनी योगदान दिले.


College of Education Dist. Solapur Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2022 - 2023**

# रयतेचा कैवारी

संपादक : शाहू संभाजी भारती ( दैनिक रयतेचा कैवारी, वर्ष चौथे, अंक ०७५, एकूण अंक १०५०) गुरुवार दि.२२/१२/२०२२ पान ०३

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात अल्पसंख्याक दिन साजरा

सोलापूर : दि.२१ ( रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा ) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना व कुल क्र ३ आकाश यांच्या संयुक्त विद्यमाने अल्पसंख्यांक हक्क दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. संजय करंडे व कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे व बी. एड. विभाग प्रमुख प्रा. डॉ. एस.डी भिलेगावकर तसेच प्राध्यापक डॉ. पी. ए. पाटील, डॉ.एम. व्ही. मते, आकाश कुल मार्गदर्शक प्रा. डॉ.आर. ए. फुरडे उपस्थित होते.



अल्पसंख्यांक दिनाच्या निमित्ताने निबंध व भित्तिपत्रक स्पर्धेचे आयोजन केले. त्यामध्ये प्रथम व द्वितीय नंबर काढण्यात आले. निबंध मध्ये प्रथम प्रगती कळसुले, द्वितीय शेळके देवयानी तर भित्तिपत्रकामध्ये प्रथम विद्या ठोंबरे व द्वितीय शेख मुशिरा या प्रशिक्षणार्थींना कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. संजय करंडे व माननीय प्राचार्य डॉ.एस. एस. गोरे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

युनिव्हर्सिटी मध्ये गोल्ड मेडल मिळवलेले प्रशिक्षणार्थी कुमारी मानसी निंबाळकर (बी.एड.), शितल लोंढे (एम. एड.) यांचा सत्कार महाविद्यालयाचे प्राचार्य माननीय प्रा. डॉ. एस. एस. गोरे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे व महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सागर कापसे व प्रगती कळसुले मॅडम यांनी अल्पसंख्याक दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त केले.

प्रा.डॉ. एस. एस. गोरे यांनी अध्यक्षीय समारोप केला. उपस्थितांचे आभार नलवडे अपर्णा यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पाटील ज्ञानेश्वरी व पाटील मंजुषा यांनी केले. या कार्यक्रमाला बी. एड. प्रथम वर्ष व द्वितीय वर्षातील प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2022 - 2023**

# रयतेचा कैवारी

संपादक : शाहू संभाजी भारती ( दैनिक रयतेचा कैवारी, वर्ष चौथे, अंक ०७६, एकूण अंक १०५१) शुक्रवार दि.२३/१२/२०२२ पान ११

## बार्शी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मतदार नोंदणी अभियान



सोलापूर : दि.२२ (रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) 'मतदान हे प्रत्येक नागरिकाचे आद्यकर्तव्य आहे' लोकशाहीत प्रत्येक व्यक्तीचे मत हे खूप मौल्यवान असते आहे, कारण एका मतातही सरकार पाडून ते बनवण्याची ताकद असते, पण आजही अनेकांना आपला मताधिकार वापरण्याची जाणीव नाही.भारत ही जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे.

आपल्या मताचा वापर करून राष्ट्राच्या उभारणीत आणि विकासात पूर्ण योगदान देण्यासाठी मतदार यादीत नावनोंदणी करून घ्यावी. ज्याचे मतदार यादीत नाव आहे, त्यांनी ते आधारकार्डशी लिंक करून घ्यावे, असे आवाहन बार्शी तालुक्याचे नायब तहसीलदार मा श्री ए डब्ल्यू काझी यांनी उपस्थितांना केले.

शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी, राष्ट्रीय सेवा योजना, निवडणूक साक्षरता मंडळ व तहसील कार्यालय बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नवीन मतदार नोंदणी व आधारकार्ड जोडणी अभियानाप्रसंगी नायब तहसीलदार मा श्री ए डब्ल्यू काझी बोलत होते. यावेळी महसूल सहायक उदय कोंढारे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस गोरे उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. एस एस गोरे म्हणाले की, भारतातील प्रत्येक नागरिकाने मतदान करण्यासाठी आपले नाव मतदार यादीत तपासावे आणि प्रत्येक मतदाराने देशहितासाठी मतदान करणे अत्यंत गरजेचे आहे. वयाच्या १८ वर्षानंतर भारतातील प्रत्येक नागरिकाला मतदानाचा अधिकार प्राप्त आहे. हा अधिकार प्राप्त करुन घेण्यासाठी मतदार यादीत नाव असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी स्वयंप्रेरणेने नावे मतदार यादीत नोंदवावीत. प्रास्ताविक नोडल अधिकारी प्रा. डॉ. एम. व्ही मते यांनी केले तर सूत्रसंचालन देवयानी शेळके यांनी केले. आभार सुशिल व्हळे यांनी मानले. कार्यक्रमास प्राध्यापक , कर्मचारी व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते..

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2022 - 2023**

पुढारी

News by
गणेश गोडसे,बार्शी



बार्शी : मतदार नोंदणी कार्यक्रमात उपस्थित अधिकारी.

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मतदार नोंदणी अभियान

**बार्शी :** आपल्या मताचा वापर करून राष्ट्राच्या उभारणीत आणि विकासात पूर्ण योगदान देण्यासाठी मतदार यादीत नावनोंदणी करून घ्यावी. ज्यांचे मतदार यादीत नाव आहे, त्यांनी ते आधारकार्डशी लिंक करून घ्यावे, असे आवाहन बार्शी तालुक्याचे नायब तहसीलदार ए.डब्ल्यू. काझी यांनी उपस्थितांना केले. शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आयोजित नवीन मतदार नोंदणी व आधारकार्ड जोडणी अभियानाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी महसूल सहाय्यक उदय कोंढारे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे म्हणाले की, भारतातील प्रत्येक नागरिकाने मतदान करण्यासाठी आपले नाव मतदार यादीत तपासावे आणि प्रत्येक मतदाराने देशहितासाठी मतदान करणे अत्यंत गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी स्वयंप्रेरणेने नावे मतदार यादीत नोंदवावीत. प्रास्ताविक नोडल अधिकारी प्रा. डॉ. एम. व्ही. मते यांनी केले. सूत्रसंचालन देवयानी शेळके यांनी केले. सुशील व्हळे यांनी आभार मानले.

My Solapur Edition
Dec 24, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

College of Education
Dist. Solapur
Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

## Publicity 2022 - 2023

पुढारी

News by
गणेश गोडसे,बार्शी

### शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सुशासन दिन साजरा

**बार्शी :** येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचा जन्मदिन सुशासनदिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी डॉ. व्ही.पी. शिखरे उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. यानिमित्ताने बी.एड. प्रशिक्षणार्थींनी पोस्टर निर्मिती व सादरीकरण केले. यात 'सुशासन दिन', 'अटलबिहारी वाजपेयी एक प्रतिभासंपन्न व्यक्तिमत्त्व', 'एक यशस्वी पंतप्रधान व एक साहित्यिक' असे विषय देण्यात आले होते. बी.एड. प्रशिक्षणार्थींनी विषयनिहाय पोस्टर सादरीकरण केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. व्ही.पी. शिखरे यांनी सुशासनदिनाचे औचित्य साधून मार्गदर्शन केले तसेच माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला. यावेळी कुल मार्गदर्शक डॉ. पी.ए. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रियंका देवकर यांनी केले. आभार प्रतीक्षा चोबे यांनी मानले. सायली बाराते व प्रतिज्ञा भदेकर यांनी सूत्रसंचालन केले.

My Solapur Edition
Dec 30, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

College of Education, Dist. Solapur, Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2022 - 2023**

पुढारी

News by
गणेश गोडसे,बार्शी

## राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर सुरू

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विशेष श्रमसंस्कार शिबिर १ जानेवारी ते ७ जानेवारी २०२३ या कालावधीत राबविले जाणार आहे. युवकांचा ध्यास ग्राम शहर विकास असा मुख्य विषय आहे. हे शिबिर उपळाई ठोंगे येथील जिल्हा परिषद शाळा व किसान कामगार विद्यालय येथे आयोजित केले आहे. या शिबिराचा प्रारंभ संस्थेचे जयकुमार शितोळे यांच्या उपस्थितीत झाला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे होते. डॉ.एम.एस. डिसले यांनी प्रास्ताविक केले. शितोळे यांनी रासेयो स्वयंसेवक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आभार प्रा. सुरवसे यांनी मानले.

Solapur Edition
Jan 5, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

College of Education Dist. Solapur Barshi.

पुढारी

# बार्शीच्या महाविद्यालयात भूगोल दिन

**बार्शी :** येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात भूगोल दिन व मकर संक्रांत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, तर पाहुणे म्हणून डॉ. रामेश्वर कोठावळे उपस्थित होते. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज व कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी स्वाती सुरवसे व जावेद पटेल यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. व्ही. पी. शिखरे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. रामेश्वर कोठावळे यांनी भूगोलदिनाचे औचित्य साधून मार्गदर्शन केले. ते म्हणाले, निसर्गाचा परिचय करून घ्या. निसर्गाशी समतोल साधा. बदलत्या जीवनशैलीमुळे पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी भूगोल दिन व मकर संक्रांत याविषयी सविस्तर माहिती दिली. प्रास्ताविक निकिता सरफाळे यांनी केले.

My Solapur Edition
Jan 16, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2022 - 2023**

पुढारी

## आंतरमहाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धेत शिक्षणशास्त्र महाविद्यालय उपविजेते

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जयंतीनिमित्त संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या आंतर महाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धेत शिक्षणशास्त्र महाविद्यालयाने उपविजेतेपद मिळवले.

महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी हस्ताक्षर, वक्तृत्व, चित्रकला व निबंध स्पर्धेत सहभाग नोंदवला. हस्ताक्षर स्पर्धेमध्ये अंकिता धस हिने प्रथम क्रमांक मिळवला. वक्तृत्व स्पर्धेमध्ये प्रतिज्ञा भदेकर यांनी तृतीय क्रमांक मिळवला. चित्रकला स्पर्धेमध्ये सोनाली रामगुडे यांनी प्रथम क्रमांक मिळवला. निबंध स्पर्धेमध्ये रुपाली जाधव यांनी प्रथम क्रमांक मिळवला. हस्ताक्षर व चित्रकला स्पर्धेचे सांघिक पारितोषिक महाविद्यालयास मिळाले. जगन्नाथ शिनगारे, ऋतुजा गरड, पूनम पंडित व आकाश माळी या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिली. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष एन. एन. जगदाळे, सचिव पी. टी. पाटील, ए. पी. देबडवार, जे. सी. शितोळे, प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे आदींनी अभिनंदन केले.

My Solapur Edition
Jan 16, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

College of Education
Dist. Solapur
Barshi.

पुढारी

News by
गणेश गोडसे,बार्शी

## मतदार दिनानिमित्त 'जाणीव जागृती' रॅली

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त 'मतदार जाणीव जागृती' रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीमध्ये मतदार उद्बोधक घोषवाक्य व फलक घेऊन विविध प्रकारच्या वेशभूषा करून बी.एड. प्रथम वर्ष प्रशिक्षणार्थी आणि प्राध्यापकवृंद सहभागी झाले होते.

रॅलीच्या उद्घाटनावेळी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे तसेच डॉ. व्ही.पी. शिखरे, डॉ. एस.एम. लांडगे, डॉ. आर.ए. फुरडे व डॉ. पी. ए. पाटील उपस्थित होते. प्रास्ताविक अमृता मुंढे यांनी केले. नूतन लोंढे यांनी उपस्थितांना मतदार शपथ दिली. सूत्रसंचालन रितू शिंगण यांनी केले. कोमल करळे यांनी आभार मानले. प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे म्हणाले, की १८ वर्षे पूर्ण असलेल्या प्रत्येक भारतीय नागरिकाने मतदान करणे हे आपले कर्तव्य समजले पाहिजे. रॅलीच्या यशस्वीतेसाठी डॉ. पी. ए. पाटील व प्रशिक्षणार्थ्यांनी परिश्रम घेतले.

Solapur Edition
Jan 29, 2023 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

College of Education
Dist. Solapur
Barshi.

पुढारी

News by
गणेश गोडसे,बार्शी


संक्षिप्त




बार्शी : राज्यस्तरीय शिबिरासाठी निवड झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांसह शिक्षक.

## राज्यस्तरीय 'रासेयो' शिबिरासाठी 'शिक्षणशास्त्र'च्या प्रशिक्षणार्थ्यांची निवड

**बार्शी :** येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडील पाच स्वयंसेवकांची सोलापूर विद्यापीठ, सोलापूर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय शिबिराकरिता निवड झाली आहे. बी.एड. विभागातील सुशीलराजे भोसले, जावेद पटेल, सोनाली आगलावे, अपर्णा नलावडे व अपर्णा पाटील यांची निवड झाली आहे. निवड झालेल्या स्वयंसेवकांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे. राज्यस्तरीय शिबिर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर द्वारा संलग्नित शिवप्रसाद सदानंद जयस्वाल महाविद्यालय, अर्जुनी /भोर, जि. गोंदिया या ठिकाणी १३ ते १९ फेब्रुवारी २०२३ या कालावधी निमगाव, ता. अर्जुनी /भोर, जि. गोंदिया येथे आयोजित केले जाणार आहे. महाविद्यालयातील निवड झालेल्या प्रशिक्षणार्थींचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, सर्व विभागप्रमुख, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. एम. एस. डिसले, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, प्रशिक्षणार्थी यांनी अभिनंदन केले.


My Solapur Edition
Feb 15, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in


College of Education Dist. Solapur Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2022 - 2023**

पुढारी

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मराठी भाषा गौरवदिन साजरा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालायात कवी कुसुमाग्रज तथा वि.वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरवदिन म्हणून साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून जय जगदंबा शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एल.तांबे, तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे होते. यावेळी डॉ. एस.डी. भिलेगावकर, डॉ. पी. ए. पाटील उपस्थित होते.

डॉ. तांबे यांनी मराठी भाषा गौरवदिनाचे महत्त्व स्पष्ट केले. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे म्हणाले, मराठी भाषेची साहित्यसंपदा विपुल असून या भाषेला थोर परंपरा लाभली आहे. स्पर्धात्मक जगात टिकून राहण्यासाठी मराठी भाषेसोबत इतर भाषा येणेसुद्धा गरजेचे असले तरी आपल्या मराठी भाषेचे महत्त्व टिकवून ठेवणेदेखील तेवढेच आवश्यक आहे. मराठी भाषेतील साहित्य समृद्ध असल्याने येणाऱ्या पिढीला मराठी साहित्याची ओळख करुन दिली पाहिजे. मान्यवरांच्या हस्ते भित्तीपत्रकाचे उद्‌घाटन केले. आकाश माळी व अंकिता धस यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविक शिवानी कांबळे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय अश्विनी भिवरकर यांनी करून दिला. कोमल करळे यांनी आभार व्यक्त केले. आकांक्षा क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले.

Solapur Edition
Mar 1, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

College of Education
Dist. Solapur
Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2022 - 2023**

पुढारी

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

**बार्शी** : येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. शशिकांत गायकवाड, तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे उपस्थित होते. प्रा. डॉ. शशिकांत गायकवाड म्हणाले, चंद्रशेखर वेंकटरामन यांच्या सन्मानार्थ विज्ञानदिन साजरा केला जातो. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे म्हणाले, विज्ञान आणि तंत्रज्ञान हे आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. प्रास्ताविक अश्विनी भिवरकर यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय सायली बाराते यांनी करून दिला. सोनाली आगलावे यांनी आभार व्यक्त केले.

My Solapur Edition
Mar 4, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

College of Education
Dist. Solapur
Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

## Publicity 2022 - 2023

पुढारी

# बार्शीत शिक्षिकांसाठीच्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालय व जिजाऊ, सावित्री, रमाई महिला बाल विकास समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिन व लक्ष्मीबाई जगदाळे यांच्या जयंतीनिमित्त बार्शी तालुक्यातील शालेय स्तरावरील कार्यरत महिला शिक्षकांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेचा समारोप व पारितोषिक वितरण कार्यक्रम शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या सभागृहात झाला. प्रमुख पाहुणे सिल्व्हर ज्युबिली प्रशालेचे मुख्याध्यापक प्रशांत कोल्हे हे होते. अध्यक्षस्थानी संस्था सचिव पी.टी. पाटील होते. व्यासपीठावर जयकुमार शितोळे, डॉ. चंद्रकांत मोरे, प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे आदी उपस्थित होते.



**बार्शी : स्पर्धेतील विजेत्या महिलांचा सन्मान करताना मुख्याध्यापक प्रशांत कोल्हे, पी.टी. पाटील व इतर.**

यानिमित्ताने घेण्यात आलेल्या स्पर्धेत महाराष्ट्र विद्यालय बार्शी (प्रथम), किसन कामगार विद्यालय उपळाई (द्वितीय), सुयश विद्यालय तांदूळवाडी (तृतीय) या क्रमांकाचे ग्रीन अ‍ॅवॉर्ड मिळाले. 'पर्यावरणदूत' हा पुरस्कार किसान कामगार विद्यालय उपळाईच्या विजया माने यांना मिळाला. विजेत्यांना रोख रकम, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. शितोळे म्हणाले की, महिलांनी पुढे येऊन धाडसाने कार्य करण्याची गरज आहे. स्वातंत्र्याच्या लढ्यात महिलांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले आहे. प्राचार्य डॉ. गोरे म्हणाले की, समाजामध्ये निम्मी लोकसंख्या महिलांची आहे. या महिला संघटित होऊ शकल्या नाहीत. कोल्हे म्हणाले, महिलांनी झोकून देऊन काम करावे. आज तंत्रज्ञानाचे युग आहे. या तांत्रिक जगामध्ये महिलांनी अत्याधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून एक आदर्श निर्माण करावा.

पाटील म्हणाले, समाजातील सर्वात सहनशील वर्ग महिला आहेत. समाजात व कुटुंबात महिलांचे योगदान फार मोठे आहे. परीक्षक म्हणून डॉ. व्ही. बी. किडगावकर, अशोकानंद राक्षे व डॉ. पी. ए. पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एल. आय. राठोड यांनी केले. साधना तांबे यांनी सूत्रसंचालन केले. उपस्थितांचे आभार शीतल लोंढे यांनी मानले.

My Solapur Edition
Mar 18, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2022 - 2023**

पुढारी

News by
गणेश गोडसे,बार्शी



**बार्शी : डॉ. सुग्रीव गोरे यांना 'आदर्श प्राचार्य' पुरस्कार प्रदान करताना माजी मंत्री रत्नमाला सावनूर व मान्यवर.**

## डॉ. गोरे 'आदर्श प्राचार्य' पुरस्काराने सन्मानित

**बार्शी :** बार्शीतील शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन नॅशनल रूरल डेव्हलपमेंट फाऊंडेशन बेळगावी या संस्थेच्या वतीने गोवा येथे त्यांना 'आदर्श प्राचार्य' पुरस्काराने गौरविण्यात आले. माजी केंद्रीय मंत्री रत्नमाला सावनूर, कर्नाटकातील जिल्हा पोलिसप्रमुख महेश मेघन्नावर, कोल्हापूरचे माजी महापौर राजू शिंगाडे, बेळगावचे खा. अमरसिंह पाटील यांच्या हस्ते सन्मान झाला. त्यांनी महाविद्यालयात राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा, परिसंवाद व परिषदा आयोजित केल्या. त्याचप्रमाणे वृक्षारोपण व संवर्धन, राष्ट्रीय मतदार जाणीव जागृती, अंधश्रद्धा निर्मूलन, महिला सबलीकरण यासंदर्भात विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन सामाजिक चळवळीला चालना दिली. महाविद्यालयातील विविध विभागांच्या निकालाची यशस्वी परंपरा कायम राखली. महाविद्यालयाला अनेक पुरस्कार मिळवून दिले. डॉ. बी. वाय. यादव, नंदन जगदाळे, पी.टी. पाटील, अरुण देबाडवार, बापू शितोळे आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

My Solapur Edition
Mar 31, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

College of Education Dist. Solapur Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2022 - 2023**

पुढारी

News by
गणेश गोडसे,बार्शी

## युवा संसदेत नेतृत्व करणार कृषिकन्या अपर्णा पाटील

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**



राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन व युनिसेफ महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने, मुंबई येथे दिनांक १८ व १९ एप्रिल रोजी होणाऱ्या युवा संसद कार्यक्रमासाठी सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी बार्शी तालुक्यातील उक्कडगाव येथील रहिवाशी व बार्शीतील शिक्षण शास्त्र महाविद्यालयाची बी. एड. द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी अपर्णा पाटील हिची निवड पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठा मार्फत झाली आहे.

या कार्यक्रमासाठी पाच लाख जनतेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी ७८ जण जाणार आहेत, त्या ७८ जणांमध्ये सोलापूर जिल्ह्याचे नेतृत्व अपर्णा पाटील या करणार आहेत.

अपर्णा ही बार्शी तालुक्यातील उक्कडगाव येथील शेतकरी कुटुंबातील आहे. पाच लाख जनतेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी राज्यातून ७८ जणांची निवड करण्यात आली. त्यात सोलापूर जिल्ह्यातून अपर्णा पाटील हिची निवड झाली आहे. ही बाब सोलापूरकरांसाठी अभिमानास्पद आहे. नुकत्याच झालेल्या राज्यस्तरीय एन.एस.एस. कॅम्पमध्येही ती सहभागी झाली होती. प्राचार्य सुग्रीव गोरे, एम.व्ही. मते आदींनी अभिनंदन केले.

या निवडीबद्दल अपर्णा पाटील हिचा बार्शीतील विविध संस्थेच्या वतीने सत्कार झाला.

Solapur Edition
Apr 10, 2023 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

College of Education
Dist. Solapur
Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2022 - 2023**

पुढारी

News by
गणेश गोडसे,बार्शी

## बार्शीत ठिकठिकाणी महात्मा फुले यांना अभिवादन

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

बार्शी शहरात ठिकठिकाणी स्त्री शिक्षणाचे उद्धारकर्ते महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विविध शाळा, संस्था, संघटना आदी ठिकाणी विविध उपक्रम राबवत महात्मा फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.



बार्शी : महात्मा फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना मान्यवर.

**शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी :** शिक्षणशास्त्र महाविद्यालयात महात्मा फुले जयंती कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील बी.एड्., बी.पी.एड्., एम.पी.एड्. व एम.एड्. विभागांचे प्रशिक्षणार्थी तसेच सर्व शिक्षक उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे हे होते. गोरे यांनी महात्मा फुले यांना मुलींसाठी सर्वप्रथम शाळा सुरू करताना आलेल्या अडचणी व त्यावर केलेली मात तसेच शेतकऱ्यांसाठी केलेले भरीव कार्य व समाजातील जातीयता नष्ट होण्यासाठी, समता व समानता निर्माण करण्यासाठी केलेल्या कार्याचे महत्त्व विशद केले. पी.पी. नाळे यांनी सूत्रसंचालन केले.

वंचित बहुजन आघाडी, बार्शी शहर व तालुका शाखेच्या वतीने सोमवार पेठ जुने पोलिस स्टेशनसमोर महात्मा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे शहर अध्यक्ष धनंजय जगदाळे, काँग्रेस अल्पसंख्याक जिल्हा अध्यक्ष वसीम पठाण, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे शहरप्रमुख दिनेश नाळे, वंचित कार्याध्यक्ष शरद बनसोडे, काँग्रेस शहर अध्यक्ष विजय साळुंखे, मोसिन तांबोळी, सुमित खुरंगळे, सागर माने, मंडळाचे अध्यक्ष रवी गायकवाड, खजिनदार गिरीश कांबळे, अर्जुन चव्हाण, किरण भालशंकर, किशोर ढोले, स्वप्निल लंकेश्वर, बबलू बनसोडे आदी उपस्थित होते.

**बार्शी टेक्निकल हायस्कूल :** येथे महात्मा फुले जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम महात्मा फुले यांच्या प्रतिमेला बापू काळे व संतोष उबे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. महात्मा फुले यांच्या कार्यावर सत्यजित जानराव, बापू काळे, खुळपे यांनी आपले विचार मांडले. मुख्याध्यापक विक्रम टकले अध्यक्षस्थानी होते. अमोल बारकुल यांनी आभार मानले.

**डॉ. आंबेडकर मध्यवर्ती जयंती मंडळ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळ भीमनगर, बार्शी यांच्या वतीने महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त भीमनगर चौक येथे बार्शी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी तन्वीर सय्यद, चंद्रकांत सोनवणे, विरेंद्र कांबळे, सूर्यकांत लोंढे, महेंद्रसिंग लांडगे, दीपक काकडे, अविनाश गायकवाड, मंडळाचे रवी गायकवाड, शंकर वाघमारे, रमेश बंगाळे, धीरज भोसले, दयावान कदम, नितीन मस्के, अजित कांबळे उपस्थित होते.

**दलित महासंघ :** दलित महासंघाच्या वतीने शहरातील जुन्या महात्मा गांधी पुतळ्याजवळ महात्मा फुले जयंती साजरी करण्यात आली. यावेळी संदीप अफाट, सुनील अवघडे, बप्पा झोंबाडे आदी उपस्थित होते.

**कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालय, बार्शी :** यांच्या वतीने स्त्री शिक्षणाचे आद्य प्रवर्तक महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. अध्यक्षपदी ग्रंथालयाचे उपाध्यक्ष पैगंबरील देशमुख हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून चंद्रकांत वडेकर, सुहास सुतार, सतीश पाचकुडवे आदी उपस्थित होते. हनुमंत तुपे, वैभव जगताप यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ग्रंथपाल किरीट गायकवाड यांनी केले.

My Solapur Edition
Apr 13, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

College of Education
Dist. Solapur
Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2022 - 2023**

पुढारी

News by
गणेश गोडसे,बार्शी



बार्शी : शिक्षणशास्त्र महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना मान्यवर.

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात 'समता रजनी' कार्यक्रम उत्साहात

**बार्शी :** येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पूर्वसंध्येला 'समता रजनी' कार्यक्रम झाला. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, बी. पी. एड्. विभागप्रमुख प्रा. डॉ. ए. जी. कांबळे, बी. एड्. विभागप्रमुख प्रा. डॉ. एस.डी. भिलेगावकर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन झाले. प्रास्ताविक प्रा. पी. पी. नरळे यांनी केले. बी. एड्. प्रशिक्षणार्थी श्रीकृष्ण गव्हाणे याने गीत गायिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील प्रसंग सुशांत ठेंगले यांनी कथन केले. बी. पी. एड्. प्रशिक्षणार्थी भाग्यश्री गायकर व सोनल रामगुडे यांनी डॉ. आंबेडकर यांचा जीवनपट पीपीटीद्वारे मांडला. अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन संघर्षाची, त्यांनी सहन केलेल्या हालअपेष्टांची तसेच खडतर परिस्थितीतून प्राप्त केलेले उच्च ज्ञान याविषयी [illegible]

Solapur Edition
Apr 15, 2023 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

College of Education
Dist. Solapur
Barshi.

पुढारी

News by
गणेश गोडसे,बार्शी



बार्शी : शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील राष्ट्रीय वेबिनारप्रसंगी डॉ. बी. वाय. यादव, डॉ. संभाजीराव शिंदे व इतर.

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय वेबिनार

**बार्शी :** येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आझादी का अमृतमहोत्सव निमित्ताने ऑनलाईन राष्ट्रीय वेबिनारचे यशस्वी आयोजन करण्यात आले. हवामान बदलाचा पिण्याच्या पाण्यावर होणारा परिणाम आणि उपाययोजना हा वेबिनारचा विषय होता. अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष डॉ. बी.वाय. यादव होते. साधन व्यक्ती म्हणून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील डॉ. संभाजीराव शिंदे व मुंबई विद्यापीठातील डॉ. सुनीता मग्रे उपस्थित होते. यावेळी सी.एस. मोरे, प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे, डॉ. व्ही.पी. शिखरे, डॉ. पी.ए. पाटील, डॉ. एस.एल. जाधव आदी उपस्थित होते. यादव यांनी हवामान बदल आणि पाण्याचे स्रोत यावर माहिती सांगितली. डॉ. मग्रे यांनी आपत्ती व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले. वेबिनारचे प्रास्ताविक डॉ. पी. ए. पाटील यांनी केले. डॉ. एम. व्ही. मते, डॉ. एम. एस. डिसले, प्रा. स्मिता सुरवसे, डॉ. ए. जी. कांबळे आदींनी परिश्रम घेतले. पी. पी. नरळे यांनी सूत्रसंचालन केले.

Solapur Edition
Apr 27, 2023 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

College of Education Dist. Solapur Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2022 - 2023**

पुढारी

News by
गणेश गोडसे,बार्शी

## संक्षिप्त



बार्शी : आयुष संस्थेच्या भेटीप्रसंगी कॉलेज ऑफ एज्युकेशनमधील प्रशिक्षणार्थ्यांसह शिक्षकवृंद.

## कॉलेज ऑफ एज्युकेशनची आयुष संस्थेस भेट

**बार्शी :** बार्शीतील कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या बी.एड्. व बी.पी.एड्. प्रशिक्षणार्थ्यांनी आयुष व्यसनमुक्ती संस्थेस अभ्यास भेट दिली. एनसीटीई, नवी दिल्ली व सामाजिक न्याय विभाग, समान संधी केंद्र यांच्या आदेशानुसार आत्मनिर्भर भारत आणि नशामुक्त भारत या अभियानांतर्गत 'मेक इन इंडिया' संस्थेस भेट या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. संदीप तांबारे, डॉ. सरडे, प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे, डॉ. एस.डी. भिलेगावकर, डॉ. ए. जी. कांबळे, डॉ. एम. व्ही. मते, प्रा.पी. पी. नरळे, प्रा. स्मिता सुरवसे, डॉ. पी. ए. पाटील, प्रा. आर. एस. डिसले, आयुषचे कर्मचारी उपस्थित होते. संचालक डॉ. संदीप तांबारे यांनी आयुष संस्थेबाबत माहिती दिली. युवा पिढीने व्यसनांपासून दूर राहिले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. भविष्यात आयुष संस्थेच्या माध्यमातून व्यापक सामाजिक प्रबोधन चळवळ उभारण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी आयुष संस्थेच्या सामाजिक उपक्रमांचे कौतुक करताना या संस्थेच्या माध्यमातून एक नवीन समाज उदयास येत असल्याचे सांगितले. यामध्ये ४९ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते.

My Solapur Edition
May 30, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

College of Education, Dist. Solapur, Barshi.